२९

9

स्वातंत्र्य सैनिक पेन्शन
स्वातंत्र्य सैनिकांना जादा दिलेल्या पेन्शनची
वसुली करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:पीओअेस-१२८४/पेन्शन/स्वातै/विक१. स्वातै,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६/३/१९८४.

पहा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:पीओअेस. १०७७/
स्पेशा. सेल. १. एफएफ, दि. २३. ९. ७७.
२. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:पीओअेस. १२८४/
पेन्शान/स्वातै/विक१. स्वातै, दि. ७. १. ८४.

शासन निर्णय :-

१९७२ सालच्या केंद्रशासनाच्या स्वातंत्र्य सैनिक पेन्शन योजनेनुसार ज्या स्वातंत्र्य
सैनिकांना केंद्रशासनाचे पुर्ण पेन्शन द. म. रु. २००/-प्रमाणे दि. १. ९. ७७पुर्वी मिळत होते
किंवा दि. १. ९. ७७ नंतर मंजूर झाले त्यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,
क्रमांक:पीओअेस. १०७७/स्पेशा. सेल. -१-एफएफ, दि. २३. ९. ७७ नुसार दि. १. ९. ७७ नंतर राज्य-
शासनाचे पेन्शन देण्यात येऊ नये असे आदेश निर्गमित करण्यांत आले. दि. १. ९. ७७ नंतर
ज्या राज्यशासन पेन्शन धारकांना केंद्रशासनाचे पुर्ण रुपये २००/-प्रमाणे पेन्शन मंजूर
करण्यांत आले त्यांना दि. १. ९. ७७ नंतर जो राज्यशासनाचे पेन्शन दिले गेले त्याची वसुली
करण्यांत येत होती. वसुली स्थगित करण्याबाबत शासन पत्र क्र. पीओअेस. १२८४/पेन्शन/
स्वातै/विक१. स्वातै, दि. ७. १. ८४ नुसार आदेश देण्यात आले होते. शासनाने आता असा
निर्णय घेतला कीं, स्वातंत्र्य सैनिकांकडुन वसुल करण्याची राहिलेली रक्कम माफ करण्यांत
यावी.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनुमतीने व त्या विभागाचा अनौ. संदर्भ
क्रमांक ५७४/इएक्सपी-४, दि. २२. २. ८४ नुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

रा. प्र. [signature]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव/उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे/राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,

..२..